# ट्रफाल्गर स्क्वेअर



हवेत सुखद गारवा होता. आकाश अगदी निळंशार दिसत होतं. कधी नव्हे त्या पडलेल्या सुंदर उन्हात लंडन अगदी उजळुन निघालं होतं. एरवी सतत ढगाळ आकाश, पावसाळी हवा आणि बोच-या थंडीत राहणाऱ्या लंडनकरांच्या दृष्टीने त्यांच्या भाषेत असा क्लिअर अँड सनी डे म्हणजे फेस्टिवलच. अशा सुंदर वातावरणात लंडनमधील रेस्टॉरंट्स, पब्स, टूरिस्ट प्लेसेस गर्दीने अगदी भरून जातात. आज आपण अशाच एका गर्दीच्या ठिकाणी आलो आहोत - ट्रफाल्गर स्क्वेअर.

ट्रफाल्गर स्क्वेअर म्हणजे लंडनचा दिवाणखाना. लंडनमधले सर्व दिशांना जाणारे महत्त्वाचे रस्ते या चौकात एकत्र येतात त्यामुळे या चौकाची भेट हमखास होतेच. १८०५ साली इंग्लिश अॅडमिरल लॉर्ड नेल्सनच्या नेतृत्वाखाली

# ट्रफाल्गर स्क्वेअर

ब्रिटीशांनी स्पेनजवळील ट्रफाल्गर येथे झालेल्या युद्धात फ्रेंच आणि स्पॅनिश फौजांचा पराभव केला त्यावरुन या चौकाला ट्रफाल्गर असं नाव दिलं गेलेलं आहे. तसं पाहायला गेलं तर लंडनच्या ऐतिहासिक वारश्यांमधलं हे अगदी अलीकडंच प्रसिद्ध ठिकाण. १८२५ सालापर्यंत लहान लहान वस्त्या, घरं, छोटे रस्ते, घोड्यांच्या पागांनी हा परीसर व्यापला होता. पुढे व्हीक्टोरिया राणीच्या काळात या चौकाचं बांधकाम पुर्ण होऊन लॉर्ड नेल्सनच्या नावाने एक ऊंच स्तंभ बांधून त्याच्यावर त्याचा पुतळाही ऊभारण्यात आला.

या स्तंभाच्या पायथ्याशी ब्रॉझमधे घडवलेले चार भव्य सिंह ठेवलेले आहेत. स्तंभाच्या चारी बाजूंना स्क्वेअर मध्ये पोलादी देखावे उभे केले आहेत. संध्याकाळच्या सुमारास त्यावर ठेवलेले बॅटल लॅम्प्स लागतात तेव्हा स्क्वेअर फार सुंदर दिसतो. एका बॅटल लॅम्पच्या खाली असणारा एक खांब मात्र पोकळ आहे. कारण त्यात आहे लंडनमधलं सगळ्यात छोटं आणि छुपं पोलीस स्टेशन. लंडनमध्ये सहसा न दिसणारी कारंजीसुद्धा आपल्याला या स्क्वेअर मध्ये दिसतात. स्क्वेअर मध्ये अनेक पुतळ्यांचीही रेलचेल आहे. त्यात सगळ्यात विशेष पुतळा आहे तो म्हणजे पहिल्या चार्ल्स राजाचा. कारण या राजाचा तिथून अगदी बाजूलाच असणाऱ्या रस्त्यावर वध करण्यात आला होता. अशाप्रकारे वध करण्यात आलेला आणि पुतळाही असणारा तो एकमेव ब्रिटिश राजा आज स्क्वेअर मध्ये उभा आहे

लंडनच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे बऱ्याचशा युरोपियन शहरांना असतो तसा सेंट्रल स्क्वेअर लंडनमध्ये नाहीये. रेस्टॉरंट , कॅफे , संगीत असणारा ज्या ठिकाणी लोक एकत्र येऊ शकतात, आजूबाजूला पसरलेलं शहर न्याहाळू शकतात, खास पदार्थांचा आस्वाद घेऊ शकतात. . असा एखादा स्क्वेअर लंडनमध्ये नव्हता. ट्रफाल्गर स्क्वेअर ही गरज काही प्रमाणात पूर्ण करतो. कारण इतर गोष्टी जरी नसल्या तरी नॅशनल गॅलरीच्या पायऱ्यांवर उभं राहिलं आणि समोर बघितलं की तिन्ही बाजूंना उंच सुंदर इमारती दिसतात. डावीकडे दिसतं सेंट मार्टिन इन फिल्ड्स हे चर्च, मधोमध नेल्सनचा स्तंभ आणि स्तंभाच्या पलीकडे आपली नजर व्हाईट हॉल रस्त्यावर जाऊन स्थिरावते ती थेट रस्त्याच्या टोकाला असणाऱ्या बिग बेनवर. एका क्षणात नजरेच्या टप्प्यात येणारा हा अर्ध्या पाऊण किलोमीटरचा परिसर लंडनच्या इतक्या गजबजलेल्या भागात असून सुद्धा विलक्षण आनंद देऊन जातो आणि म्हणूनच त्याला 'द फाईनेस्ट साईट' असंही म्हटलं जातं